# महापालिकेत तीन वर्षापासून ठाण मांडून होता तोतया कर्मचारी

**बनावट पगार स्लिप आणि आय-कार्डही केले होते तयार | महापालिका प्रशासनाने ओलांडली भोंगळ कारभाराची सीमा**









**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** – अमरावती महापालिकेच्या बांधकाम विभागात एक तोतया कनिष्ठ लिपिक आढळून आल्याने 13 फेब्रुवारी रोजी खळबळ उडाली आहे. तब्बल तीन वर्षांपासून हा तोतया कर्मचारी येथे कार्यरत असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. याप्रकरणी कार्यकारी अभियंता रविंद्र पवार यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी या तोतया कर्मचाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे. इतक्या वर्षांपासून एक कर्मचारी चक्क एक टेबल घेवून बसतो, आणि त्याची कोणत्याच विभाग प्रमुखाला माहिती नसावी, ही तर मनपा प्रशासनाने भोंगळ कारभाराची सीमा ओलांडली असल्याचे म्हटले जात आहे. ओम पांडुरंग पाटील (29, रा. छांगणीनगर) असे त्या तोतया कर्मचाऱ्याचे नाव आहे.

माहितीनुसार, ओम पाटील यांनीही महापालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे स्वतऱ्चे बनावट ओळखपत्र बनविले होते. ओम पाटील या नावाच्या व्यक्तीने आयडी स्वतऱ्साठी तयार केला होता, ज्या कर्मचार्याच्या नावे तो आयडी होता, तो आधीच महापालिकेच्या झोन क्रमांक 3 मध्ये कार्यरत आहे. ओम पाटील यांच्या बनावट ओळखपत्रावर महापालिकेच्या उपायुक्त प्रशासनाच्या स्वाक्षरी व शिक्काही होता. ओम पाटील हा मनपात कर्मचारी म्हणून फिरत असल्याची तक्रार एका व्यक्तीने वरिष्ठ अधिकार्यांना केली. त्यामूळे उपायुक्त महेश देशमुख यांनी 13 फेब्रुवारी रोजी आपल्या कर्मचाऱ्यांसह जावून ओम पाटीलला बांधकाम विभागात पकडले. त्यानंतर याबाबतची माहिती शहर कोतवाली पोलिसांना दिली. त्यानंतर कोतवाली पोलिसांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास करत ओम पाटील याला महापालिकेच्या आवारातूनच ताब्यात घेतले. त्यानंतर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले.

> महापालिकेच्या आवारात एक माणूस कर्मचारी म्हणून फिरत असल्याचे पाहून, नागरिकांना त्याला पकडले. तो महापालिकेचा कर्मचारी नाही. याबाबत पुढील चौकशी सुरु आहे.
>
> **सचिन कलंत्रे, मनपा आयुक्त.**

### बनावट पगार स्लिप दाखवून बनविले आयकार्ड

ओम पाटील यांने बनावट पगार स्लिप दाखवून अधिकृत ठिकाणाहून आपले आयकार्ड बनवून घेतले होते. विशेष म्हणजे ओम पाटील हा कंत्राटावरही नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भंवर यांनी कोतवाली पोलिस ठाणे गाठले. दोन्ही अधिकाऱ्यांनी ही बाब गांभीर्याने घेत आवश्यक निर्देश दिले.

### स्थापत्यचे नाव सांगितले

या आरोपीने चौकशीत सांगितले की, तो स्थापत्य कंपनीमध्ये नागपूरमध्ये काम करित होता, त्यानंतर अकोला येथील सम्यक संस्थेत रत्नाकर पारखी यांचे कडे महानगर पालिका अकोला येथे काम केले. त्यानंतर अमरावती महानगर पालिका येथे बांधकाम विभागात 3 वर्षापासून काम केले. वेतन मिळत नसतानाही लोकांची कामे करुन तो त्यांच्याकडून पैसे घेत असल्याचे त्याने सांगितले. नगररचना, टॅक्स विभागतही तो काम करत होता, असेही त्याने सांगितले. त्याला मुद्दाम कुणीतरी महापालिकेत दोन नंबरचे काम करण्याकरिता बसविले असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# प्रसूतीदरम्यान मातेसह बाळाचा मृत्यू

**अचलपूर उपजिल्हा रुग्णालयातील धक्कादायक प्रकार**

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर( दि.13 )**– येथील उपजिल्हा रुग्णालयात चिखलदरा तालुक्यातील खटकाली गावातील 19 वर्षीय महिलेचा प्रसूती दरम्यान नवजात बाळासह दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बुधवारी(दि.12)घडली. मृतक गर्भवती महिला ही सिकलसेल आजाराने ग्रस्त असतांना तिला प्रसूतीसाठी दाखल केल्यानंतर संबंधित डॉक्टरांनी व कर्मचार्यांनी अमरावती येथे तत्काळ का पाठवले नाही,असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्या महिलेच्या नातेवाईकांनी डॉक्टर व कर्मचार्यांच्या कारभारावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

चिखलदरा तालुक्यातील खटकली गावातील मृतक गर्भवती महिला जयश्री सुरेश भास्कर (वय 19) ही सिकलसेल आजाराने ग्रस्त होती. 12 फेब्रुवारीला तिला अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले. तिच्यावर पूर्वी चिखलदरा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु होते. दरम्यान प्रकृती गंभीर असल्यामुळे जयश्रीला अचलपूर उप जिल्हा रुग्णालयात तात्काळ प्रसूतीसाठी हलविण्यात आले.यानंतर अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टर व कर्मचार्यांनी तिला प्रसूतीसाठी संबंधीत वार्डात नेले. काही वेळाने महिला आणि नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी नातेवाईकांना सांगीतले.त्या नातेवाईकांनी आक्रोश व्यक्त केला. मृतक जयश्रीवर संबंधित डॉक्टर व कर्मचार्यांकडून तत्काळ योग्य उपचार न मिळाल्याचा आरोप सुद्धा नातेवाईकांनी केला. मागील नऊ महिन्यापासून तिला सिकलसेल संदर्भात योग्य उपचार मिळाला नसल्याची गंभीर बाब देखील समोर आली आहे. मेळघाट मतदार संघात गरोधर आदिवासी मातेच्या मृत्यूची वाढती संख्या रोखण्यामध्ये शासन व प्रशासनाला यश मिळत नसल्याचे चित्र या प्रकारावरून समोर पुन्हा एकदा समोर आले आहे.

# पथ्रोटमध्ये पोलिसांच्या वरदहस्तानेच सुरू आहेत अवैध धंदे

**वरळी मटका, दारू विक्रीला उत**

**गुटखा विक्री व रेती तस्करी ही जोरात**

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.13 )**– पथ्रोट व परिसरातील अनेक गावांमध्ये कमी भांडवलात जादा कमाईचा व्यवसाय म्हणून अनेकांनी थेट गैर कायदेशीर धंदे थाटले आहेत. त्यामुळे पथ्रोट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांचा सुळसुळाट झाला असल्याचे दिसून येते. पोलिसांचे मात्र या व्यवसायाकडे पूर्णत: दुर्लक्ष असल्याने त्यांच्या वरदहस्तानेच हे गैर कायदेशीर व्यवसाय सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

पथ्रोट पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या विविध गावांमध्ये सध्या अवैध वरळी मटका, अवैध देशी दारू व गावठी दारूची विक्री, प्रतिबंधित गुटख्याची विक्री असे गैर कायदेशीर धंदे मोठ्या प्रमाणात सुरू आहे. रेती घाटनवरून रेतीची तस्करी जोमाने केली जात आहे. राजरोसपणे हे अवैध धंदे सुरू असून अवैध व्यावसायिकांनी अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. खुलेआम सुरू असलेल्या या गैरकारभारामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झालेले असताना पोलीस प्रशासन मात्र या व्यवसायांविरोधात कुठलीही कारवाई करताना दिसून येत नाही. मावळत्या वर्षाच्या अखेरच्या दिवशी कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिंदी बु. येथे अवैध दारू विक्रीची तक्रार केली म्हणून एका युवकाची अवैध व्यावसायिकांनी तलवारीने वार करून हत्या केली होती. या घटनेनंतर तरी पोलीस प्रशासन अवैध व्यावसायिकांविरोधात कंबर कसून कारवाई करतील असे बोलले जात होते. मात्र चित्र त्याउलट आहे.

परिसरातील गावांमध्ये अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावले असून पोलिसांचा या व्यावसायिकांना आश्रय असल्याचे बोलले जात आहे. आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून परिसरातील अवैध व्यवसाय बंद करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनीचे आज उद्घाटन

**चार दिवस मार्गदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )**– कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा यांच्या वतीने आयोजित कृषी विकास परिषद व प्रदर्शनीचे शुक्रवार, दि. 14 फेब्रुवारी रोजी उद्घाटन होणार आहे. कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते या प्रदर्शनीचे उद्घाटन दुपारी 2 वाजता सायंस्कोर मैदान येथे होणार आहे. यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार किरण सरनाईक, धिरज लिंगाडे, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, जिल्हा शेतकरी सल्लागार समिती अध्यक्ष नरेंद्र शिंगणे आदी उपस्थित राहणार आहेत.

# अमित आठवलेंचा मृत्यू गुदमरल्याने

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )**– काँग्रेस नगर रोडवरील होमगार्ड कार्यालयासमोरील रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कारमध्ये अमित राजकुमार आठवले (30, रा. गगलानी नगर) यांचा मृतदेह आढळून आला होता. यामध्ये अमित आठवले यांचा मृत्यू बंद गाडीत जीव गुदमरल्यामुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट झाले आहे.

अमित आठवले हे गाडीत कसे कोंडले गेले आणि किती वेळ गाडीत बंद राहिले, याबाबत पोलिस चौकशी करीत आहेत. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरु केली असून, नागरिकांचीही चौकशी करण्यात येत आहे. अमरावतीतील गगलानी नगर कॉम्प्लेक्समधील मूळ रहिवासी असलेले अमित आठवले हे नागपूरमधील एका ज्वेलर्स शोरूममध्ये इव्हेंट मॅनेजर म्हणून काम करायचे. अमित आठवले हे कंपनीच्या काही कामासाठी नागपूरहून अमरावतीला आले होते आणि रेल्वे स्टेशन रोडवरील एका हॉटेलमधील खोलीत राहत होते.

# मोर्शी चे तहसीलदार राहुल पाटील निलंबित

**खा.अनिल बोंडे यांनी केली होती तक्रार**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.13 )** – शासकिय कामकाजात नेहमीच दिरंगाई करीत असल्याचा ठपका ठेवत अमरावती जिल्ह्यातील मोर्शीचे तहसीलदार राहुल पाटील यांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे. हे आदेश महसूल व वन विभागाचे अवर सचिव प्रवीण पाटील यांनी 11 फेब्रुवारीला काढले. निवडणुकीच्या कामात हयगय करणे तसेच नैसर्गिक आपत्तीच्या कामात अक्षम्य दिरंगाई केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आलेला आहे. याशिवाय त्यांच्या कार्यकाळात गौण खनिज उत्खनन व वाहतुकीचे प्रकारात फार मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे.



राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी तहसीलदार राहुल पाटील यांची राज्य शासनाकडे गेल्याच महिन्यात तक्रार केली होती. ही तक्रार महसूल विभागाने अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांच्याकडे चौकशीसाठी दिली होती. त्यावर त्यांनी सादर केलेल्या अहवालावरून राहुल पाटील यांच्यावर ही निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. शासनाच्या अग्रक्रमातील विषयांना प्राधान्य न देता स्वत:च्या मर्जीने कामकाज करून शासकीय योजनांचा योग्य पाठपुरावा न करता दफ्तर दिरंगाई करीत असल्याचे तसेच कार्यालयीन शिस्त पाळत नसून त्यांचा बेजबाबदार कारभार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. तहसीलदार राहुल पाटील यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 3 चे उल्लंघनाबाबत ही ठपका आहे.

# किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे दुसऱ्या दिवशीही उपोषण कायम

## शेतकऱ्यांकडून आत्मदहनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.13 )** – तहसील कार्यालयासमोर किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे वतीने सुरु असलेले शेतकऱ्यांचे बेमुदत उपोषण दुसऱ्या दिवशीसुध्दा कायम होते. लोकप्रतिनधी, शासन, प्रशासनाने या बेमुदत उपोषणाकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे.

मंडपाला पहिल्याच दिवशी तहसीलदार चव्हाण, तालुका कृषी अधिकारी आगरकर, ठाणेदार ठोसरे यांनी उपोषण मंडपाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत चर्चा केली, परंतु समाधान कारक चर्चा न झाल्याने शेतकरी आमरण उपोषण ठाम राहून उपोषणाचा दुसरा दिवस निघाला दुसरे दिवशी जिल्हा कृषी अधिकारी सातपुते साहेब उपभागिय कृषी अधिकारी आगरकर विमा कंपनीचे अधिकारी उपोषण मंडपात येऊन उपोषणकर्त्यांसोबत चर्चा केली. त्यांनी सांगितले की आम्ही शासनकडे पाठपुरावा करून मागण्या पूर्ण करू, असे सांगून उपोषण सोडवा अशी विनंती केली.



मात्र ठोस असा उपाय न निघाल्याने उपोषणकर्ते दुसऱ्या दिवशीसुध्दा आपल्या मागण्यांवर ठाम होते. मागण्या पुर्ण न झाल्यास शेतकऱ्यांनी आपआपले गावात आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. आमरण उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष तुषार निकम, किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे स्वप्निल खांडेकर, अमर ठाकरे, सुभाषराव गावंडे, पंजाबराव ठाकरे, ज्ञानेश्वर ताथोडे, निरंजन घाटोडे, विष्णू वानखडे, सरपंच शिवाजी ठाकरे, विकास भोंडे, सर्वेश ताथोडे आदी शेतकरी उपोषणाला बसले असून ही शेतकरी लढाई 'करो या मरो' ची असून शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत उपोषणाहून उठणार नसल्याचा इशारा दिला आहे.

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार रियाज अहेमद खान नियाज अहेमद खान, रा. दहिसाथ चौक, बुधवारा, अमरावती, ता.जि. अमरावती यांनी दिनेश बापुराव देशमुख वय 58 वर्ष, रा. निलंबरी, सी.एच.एस., प्लॉट नं. ए, एनएचपी शाळेजव सेक्टर-19, नवी मुंबई एरोली, ठाणे-400708 व सुभाष शरदचंद्र देशमुख, वय 46 वर्ष, रा. कल्पतरु इस्टेट, फेज-2, प्लॉट नं. 4ए/1202, जावळकर नगर, पिंपळेगुरव, पुणे-411061 यांच्या कडून मौजे-नवसारी, प्रगणे-नांदगाव पेठ, ता.जि. अमरावती येथील शेत सर्व्हे नं. 48/5 मधील जमीनीतील ज्याचा एन.ए.पी.-34/नवसारी-3/1975-76, नि.ता. 25/12/1975 मंजूर झालेल्या जागेतील प्लॉट क्र. 40 पैकी याचे एकूण क्षेत्रफळ 808 चौ. फुट दिनांक 02/05/2022 रोजी उपविभागणी व एकत्रिकरण झालेल्या नकाशाप्रमाणे प्लॉट क्र. 40/बी/सी याचे साईज मंजूर नकाशाप्रमाणे असून याचे एकूण क्षेत्रफळ 505.57 चौ.मी. (5240 चौ. फुट) ज्याची

चर्तुः सिमा : **पुर्वेस :** प्लॉट क्र. 41, **पश्चिमेस :** या प्लॉटचा उर्वरीत भाग

**उत्तरेस :** प्लॉट क्र. 53, **दक्षिणेस :** लेआऊट मधील रोड

असे प्लॉट्स साक्षीदार समक्ष 3555/- रुपये फुट प्रमाणे घेण्याचा सौदा केला आहे व याबद्दल प्लॉट्स मालक यांना रुपये 2,00,000/- (अक्षरी-दोन लाख रुपये) रोख नगदी व रुपये 2,00,000/- (अक्षरी-दोन लाख रुपये) फोन पे वरुन वरील मालक प्रमाणे नं. 1 यांना दिलेले आहे. पुढील सौद्याचे स्वरुप ठरल्याप्रमाणे प्लॉट्स मालक यांनी सौद्याचिठ्ठी नकारली आहे.

करीता सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, वरील वर्णन केलेला प्लॉट्स वरील मालकापासून कोणीही व्यवहार करू नये, केल्यास रद्द करून घ्यावे. नाहीतर सर्व नुकसान भरपाईची जबाबदारी सदरील प्लॉट घेणार वर राहील याची नोंद घ्यावी.

दि. १३/०२/२०२५

**ॲड. एच. डब्ल्यू जावरकर**

**द्वारे हिंद मेडिकल भोला मिठाईवाला जवळ, बुधवारा अमरावती**

# आता 'झेडपी' चे सर्व विभाग, कार्यालय होणार स्मार्ट

**मुख्यालयासह 14 पंचायत समितींमध्ये दर शुक्रवारी श्रमदान | सीईओ संजिता महापात्र यांची संकल्पना**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** – जिल्ह्यात स्वच्छ मिशन अंतर्गत गाव स्मार्ट केली जात आहे. याच श्रृंखलेत आता जिल्हा परिषदेचे सर्व विभाग व अधिनस्त सर्व कार्यालय स्वच्छ व नीटनेटके असणे करण्याचेही मिशन छेडण्यात आले आहे. त्यामुळे मुख्यालयातील 12 विभागांच्या कार्यालयांसह 14 पंचायत समितीमधील सर्व कार्यालय व परिसर स्वच्छ ठेवण्याकरिता दर शुक्रवारी श्रमदान करण्याचा उपक्रम सीईओ संजिता महापात्र यांनी सुरू केला आहे. येत्या शुक्रवारपासून या उपक्रमाला जिल्ह्यात सुरुवात होणार आहे.

राज्यात मुख्यमंत्री यांनी 100 दिवसीय कृती आराखडा अंमलबजावणी 1 जानेवारी ते 10 एप्रिल या कालावधीत दशसुत्री अंमलबजावणी कार्यक्रम सर्वच शासकीय कार्यालयांना दिला आहे. सदरच्या 100 दिवसीय कृती आराखड्यात सीईओंनी सर्व शासकीय कार्यालय नियमित स्वच्छ राहील या दृष्टीने प्रयत्न करणे, तसेच दर आठवड्याला स्वच्छता मोहीम राबविण्याबाबत निर्देश दिले आहेत. आठवड्यातील प्रत्येक शुक्रवारी आपले अधिनस्त कार्यालयाची (अंतर्गत) सर्व




कर्मचाऱ्यांनी श्रमदानातून स्वच्छता करणे, कार्यालय परिसराची स्वच्छता करणे तसेच कार्यालयातील दस्तऐवजांचे वर्गीकरण करून त्याची प्रचलीत पद्धतीनुसार रंगवार वर्गवारी करून बस्ते तयार करणे व त्यास सुव्यवस्थित ठेवणे, कार्यालयातील सन्माननीय व्यक्तीच्या प्रतिमांची स्वच्छता करणे तसेच प्लास्टिक बंदी व दंड, कार्यालय परिसरात धुम्रपान करण्यास मनाई व दंड, थुंकण्यास मनाई व दंड आदीचे फलक लावण्यात यावे. एकंदरीत आपले अधिनस्त कार्यालय नेटके, स्वच्छ व सुंदर असणे आवश्यक आहे. याकरिता आपण आपल्या स्तरावर कल्पकता वापरून कार्यालयाची सजावट करणे, अशा सुचना सीईओंनी पत्राद्वारे सर्व खातेप्रमुख व गटविकास अधिकारी यांना दिल्या आहे. त्यामुळे या शुक्रवारपासून जिल्हा परिषदेचे सर्वच कार्यालय स्मार्ट करण्याची अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे.

> स्मार्ट कार्यालयांमध्ये परिसर व कार्यालयातील स्वच्छतेला अधिक महत्व देण्यात आले आहे. याशिवाय सर्वच कार्यालयातील दस्तऐवजांचे वर्गीकरणाला अधिक भर दिल्या जात आहे. काही कार्यालयाने दस्तऐवजांचे वर्गीकरण केले आहे. आणखी बरेच विभाग शिल्लक आहे. ते येत्या काही दिवसांत होईल.
>
> **संजिता महापात्र, सीईओ, झेडपी.**



## PRESS TENDER NOTICE

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,**
**अमरावती इ-निविदा सुचना क्र. 40 सन 24-25**

83 गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. चांदूर बाजार व अचलपूर जि. अमरावती (जलजिवन मिशन अंतर्गत) योजनेच्या वझर येथील 52 Kwp सौर उर्जा प्रकल्पाची 6 वर्षाच्या सर्व समावेशक ऑपरेशन आणि देखभालीसह रचना, पुरवठा करणे, उभारणीकरणे, कार्यान्वितकरणे व चांचणी देणे इ. कामाकरीता शासकीय अनुभव प्राप्त एजन्सीकडून ब-1 प्रपत्रात म.जी.प्रा. कडून कामाची निविदा मागविण्यात येत आहे. या कामाची अंदाजित किमत रु.18,93,592/- इतकी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. 14/02/2025 पासून www.mahatender.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatender.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक :- 11/02/2025

**( विवेक सोळंके )**
**कार्यकारी अभियंता,**
**म.जी.प्रा.विभाग, अमरावती**

**वि.मा.का./अम/जाहि./११४३/२०२४-२०२५**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ‘असर’च्या माध्यमातून जि. प. शाळा टार्गेट असल्याचा शिक्षकांचा आरोप!

## प्राथमिक शिक्षक समितीचा आरोप - शैक्षणिक साहित्य, विक्रीचा ‘प्रथम’चा डाव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.13 )-** ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना टार्गेट केले जात आहे. शाळांच्या दर्जाबाबत समाजात जाणीवपूर्वक गैरसमज पसरवून व शिक्षकांची अवहेलना होईल अशी मांडणी %असर% या अहवालातून प्रथम संस्थेकडून केली जात आहे. त्यामाध्यमातून शैक्षणिक साहित्य सरकारी शाळांच्या माथी मारण्याचा प्रथम संस्थेचा डाव असल्याचा आरोप शिक्षकांनी केला आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता संपादणुकीचे सर्वेक्षण असरदार व्हायचे असेल तर पुढील




वर्षापासून शिक्षकांनाही सोबत घेऊन गुणवत्तेची पडताळणी करावी. शहरातील शाळांचेही सर्वेक्षण करावे, अशी भूमिका शिक्षण समितीने मांडली आहे.

**सर्वेक्षण वास्तवदर्शी**

‘प्रथम’चे कार्यकर्ते कोणत्याही शाळेत जात नाहीत. ते गावात पारावर, मैदानावर, रस्त्यावर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून शैक्षणिक गुणवत्तेची पडताळणी करतात. त्यामुळे हे तथाकथित सर्वेक्षण वास्तवदर्शी, वस्तुनिष्ठ व पारदर्शक नसल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी केला आहे.

### ‘असर’वर संघटनेचे कोणते आक्षेप

- सर्वेक्षणातून ग्रामीण भागातील शाळा-शिक्षकांची बदनामी
- विद्यार्थ्यांच्या गुणवत्ताविषयक प्रगतीची योग्य दखल नाही.
- सरकारी शाळांविषयी गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न
- गुणवत्तेत सतत घसरण आणि कधीकधी किंचित वाढ दाखवून संस्थानिर्मित शैक्षणिक साहित्य सरकारी शाळेत पुरविण्यासाठी सर्वे
- सरकारचे पाठबळ नसतानाही गुणवत्तेचा आलेख उंचावलेला
- अनेक सरकारी प्राथमिक शाळेत एकच शिक्षक, मुख्याध्यापकांवर शिक्षणाबरोबरच प्रशासकीय ताणाचा उल्लेख नाही.
- भौतिक सुविधांची वानवा, ऑनलाइन-ऑफलाइन अशैक्षणिक कामांमुळे प्रभावित अध्यापनावर सर्वेक्षणात भाष्य नाही.

# गाडी धुण्यास नकार दिल्याने सुडात्मक भावनेतून केली बदली

## कंत्राटी कर्मचारी गणेश मेडे यांचा पत्रकार परिषदेतून आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.13 )-** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलाचे वसतीगृह येथे कंत्राटी माळी म्हणून मागील दीड वर्षांपासून काम करीत आहे. असे असतांना कोणतीही तक्रार नसतांना आता नवीन आलेले गृहपाल हे कंत्राटी कामगारांना स्वत:ची गाडी धुवायला लावतात. गाडी धुण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून त्यांनी व स्मार्ट सर्विसेस कंपनीचे सुपरवायझर यांना हाताशी धरून सतत मानसिक त्रास देतात आणि खोट्या तक्रारी कंपनीकडे करून माझी बदली शासकीय वसतीगृह बोडणा अमरावती केली असा आरोप कंत्राटी कर्मचारी गणेश मेडे यांनी स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेतून केला.

दीड वर्षापूर्वी गणेश मेडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतीगृह येथे कामाला लागले. त्यावेळी गृहपाल श्री. यादव होते. मात्र त्यांची दीड वर्षात कोणतीही तक्रार नव्हती. मात्र आता निलेश वाडेकर हे गृहपाल म्हणून चांदूर रेल्वे रूजू होवून काम हाती घेतले. त्यानंतर ते स्वत:ची कार धुवायला लावत असल्याचा आरोप गणेश मेडे यांनी केला. त्यांनी पुढे सांगितले की, एक दिवस वसतीगृह परीसराची स्वच्छता केल्यानंतर कार धुतो असे बोललो. त्याचा राग मनात धरून त्यांनी गृहपाल पदाचा फायदा घेवून माझी तक्रार सतत स्मार्ट सर्विसेस कंपनीच्या व्यवस्थापकाकडे केली. त्यांचा वर्गमित्र स्मार्ट सर्विसेस सुपरवायझर विलास मोटघरे यांना बोलावून घेतले असुन ते दोघे मला मानसिक त्रास देतात. ऐवढेच नव्हे तर सुडात्मक भावनेतून माझी बदली शासकीय वसतीगृह, निंबोरा येथे करण्यात आली आहे. मला केवळ 7 हजार 500 रूपये पगार मिळतो. त्यामध्ये चांदूर रेल्वे वरून निंबोरा ये-जा करणं व कुटूंब चालविणं अशक्य झाल्याने माझ्या कुटूंबावर उपासमारीची पाळी आली आहे असे गणेश मेडे यांनी म्हटले. या विषयी सामाजिक न्याय मंत्री, समाज कल्याण आयुक्त सुनिल वारे, समाज कल्याण अधिकारी जाधवर यांना लेखी निवेदन दिले आहे. मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे दोन महिण्याचा पगार आणि चांदूर रेल्वे वसतीगृह येथे नियुक्ती देण्यात यावी. असे न केल्यास मी आत्मदहन करणार याला वरीष्ठ शासकीय समाज कल्याण अधिकारी जबाबदार राहणार असा इशारा गणेश मेडे यांनी दिला आहे.

### कामच करीत नसल्याने कंपनीकडे तक्रार

“ स्मार्ट सर्विसेस कंपनीच्या वतीने गणेश मेडे कंत्राटी कर्मचारी म्हणून कामाला आहे. परंतु ते कोणतेही काम न करीत नाही, कामावर उशीरा येतात, अरेरावीने वागतात व मुजोरी करतात. कामच करीत नसल्याने त्यांची तक्रार कंपनीकडे केली. यापूर्वी ते तुळजापूर निवासी शाळेत कामाला होते. तिथेही त्यांचे वागणं चांगलं नसल्यामुळेच त्याला कामावरून काढले. उपोषणाला बसल्यानंतर कंपनीने त्याची नियुक्ती शासकीय मुलांचे वसतीगृहात केली. आताही त्याची बदली कंपनीने केली आहे.

**निलेश वाडेकर**
**गृहपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतीगृह,चांदूर रेल्वे**

### वरीष्ठांशी अरेरावीने व मुजोरीने वागतात

“ गणेश मेडे यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहे. ते काम करीत नाही व कामात सतत हलगर्जीपणा करतात. तसेच वरीष्ठांशी अरेरावीने व मुजोरीने वागतात. त्यामुळे कंपनीने त्यांची बदली केली. माझ्याकडे तीन तालुक्याचा प्रभार असुन एकुण 54 कर्मचारी कार्यरत असुन त्यांच्या कोणत्याही तक्रारी नाहीत.

**-विलास मोटघरे**
**सुपरवायझर, स्मार्ट सर्विसेस कंपनी**

# भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाशाखेचे होणार पुनर्गठन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 ) -** संविधान समर्थक समाज जोडो अभियानांतर्गत भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात बौद्ध विविध उपक्रम राबविल्या जात आहे. याच अभियानांतर्गत मुदत संपलेल्या अमरावती पूर्व व पश्चिम जिल्हा कार्यकारिणी चे पुनर्गठन 15 व 16 फेब्रुवारी रोजी होणार आहे. शनिवारी (ता. 15) जिल्हा पूर्वच्या कार्यकारिणीचे पुनर्गठन सकाळी 11 वाजता संघमित्रा मुलींचे वस्तीगृह त्रिवेणी कॉलनी कॉंग्रेस नगर रोड येथे होणार आहे. तर 16 फेब्रुवारी रोजी पश्चिम जिल्हा शाखेच्या कार्यकारिणीचे पुनर्गठन सकाळी 11 वाजता परतवाडा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात सर्वसाधारण सभेत होणार असल्याची माहिती भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार यांनी दिली.दोन्ही जिल्हा कार्यकारिणीची निवड प्रक्रिया भारतीय बौद्ध महासभेचे राष्टीय सचिव तथा प्रदेश प्रभारी कांबळे, राष्टीय कार्यालयीन सचिव तथा महाराष्ट्र राज्य सरचिटणीस अशोक केदारे व राज्य संघटक चौरपगार यांच्या उपस्थितीत होणार आहे. कार्यकारिणी पुनर्गठन सभेला जिल्हाभरातील आजी-माजी पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक शिक्षिका, बौद्धाचार्य, श्रामनेर हितचिंतकांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी सैनिक दिनेश सुरोसे यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

## इंटरनॅशनल गांधी पीस फाउंडेशन, नेपाळने केले सन्मानित



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.13 ) -** तालुक्यातील घुईखेड येथील माजी सैनिक प्रा. दिनेश नामदेवराव सुरोसे यांना इंटरनॅशनल गांधी पीस फाउंडेशन, नेपाळ व्दारा डॉक्टरेट पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

दिनेश सुरोसे हे भारतीय थलसेनेमध्ये 17 वर्ष भारत मातेची व आपल्या मातृभूमीची सेवा करून आर्मी मधून सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी समाज सेवेमध्ये पूर्ण वेळ देऊन शैक्षणिक क्षेत्रात बरेचशा नव युवकांना आपल्या देशाप्रति मातृभूमी प्रती एक नवीन प्रेरणा देऊन भारतीय सेनेमध्ये व विविध क्षेत्रात अधिकारी या पदावर पोहोचण्याकरिता योग्य मार्गदर्शन केले. तसेच स्वखर्चाने गरजू गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण सुध्दा दिले. याशिवाय प्रत्येक क्षेत्रामध्ये, वृद्धाश्रम, अनाथआश्रम व समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय समाजकार्य केल्याबद्दल त्यांना महात्मा गांधी आश्रम सेवाग्राम येथे इंटरनॅशनल गांधी पीस फाउंडेशन नेपाळ तर्फे डॉक्टर पदवी प्रदान करून नुकतेच सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये लालबहादूर राणा, डॉ. सुनील परदेशी, भारतीय सैन्य दलातील अधिकारी श्री मानकर, डॉ. मनोहर चव्हाण, डॉ. संजय राठोड असे सैन्यदलातील अनेक अधिकारी व समाजसेवी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीमध्ये दिनेश सुरोसे यांना सन्मान प्राप्त झाला आहे. यामुळे त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# आजीवन अध्ययन विभागातील विद्यार्थ्यांचा संशोधन अभ्यास दौरा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 ) -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत येणाऱ्या एम.ए. योगशास्त्र, पी.जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी अ‍ॅन्ड योगिक सायन्स, पी.जी. डिप्लोमा इन योगथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता हरिद्वार येथे (दि.12) अभ्यास दौ--याचे आयोजन करण्यात आले आहे. योगथेरपी, निसर्गोपचार योग चिकित्सा प्रणाली, प्रात्यक्षिकाचे सखोल ज्ञान मिळावे आणि आधुनिक उपकरणांची माहिती व्हावी, या हेतूने हा अभ्यास दौरा आयोजीत



करण्यात आला आहे. अभ्यास दौऱ्-यादरम्यान हरिद्वार येथील शांतीकुंज गायत्री शक्तीपीठ, देव संस्कृती विश्वविद्यालय, परमार्थ निकेतन,पतंजली योगपीठ येथे भेट देऊन विविध आध्यात्मिक आणि शैक्षणिक केंद्रांमध्ये महत्त्वाचे स्थान असलेल्या या ठिकाणी भेट दिली जाणार आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनात पी.जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी अँड योगिक सायन्स अभ्यासक्रमाच्या समन्वयिका डॉ. अश्विनी राऊत, एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा. आदित्य पुंड, पी.जी. डिप्लोमा इन योग थेरपी अभ्यासक्रमाच्या समन्वयिका प्रा. राधिका खडके, प्रा. प्रफुल्ल गांजरे यांच्या नेतृत्वात अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# 3 गायींना दिले जीवनदान

**अमरावती -** करजगाव-लेहगाव मार्गाने गोवंशांची अवैध वाहतूक करणार्या एका वाहनाला पोलिसांनी 24 जानेवारी रोजी पकडले. माहुली पोलिसांनी एमएच 37/टी 2335 क्रमांकाच्या वाहनाचा पाठलाग केला. त्यावेळी चालकाने लेहगाव रस्त्यावरील एका शेतात वाहन उभे करून तेथून पळ काढला. वाहनात चार गुरे आढळून आली. त्यापैकी एक गोवंशचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी 3 लाख 80 हजार रुपयांची वाहने व गुरे व इतर माल जप्त केला आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांची विटभट्टी कामगारांना भेट

## कामगारांच्या पाल्यांना आरोग्य व शिक्षण सुविधा पुरविण्याचे आदेश

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.13 )-**जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी संचिता मोहपात्र यांनी 7 फेब्रुवारी कोंडेश्वर मार्गावरिल तसेच अंजनगाव बारी येथील विटभट्टी कामगारांना कामांच्या ठिकाणी भेट दिली.

यावेळी त्यांनी विटभट्टी कामगार, महिला व पाल्यांना दिलेल्या सुविधा व उद्भविणाऱ्या समस्येविषयी जाणून घेतले. यावेळी संजिता मोहपात्रा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी अंतर्गत येत असलेल्या वीटभट्टी कामाकरिता मेळघाटातील लोकांना प्राथमिक आरोग्य केंद्र कडून कशा चांगल्या प्रकारे आरोग्य सुविधा मिळतात, त्याबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावेळेस डॉ.सुरेश असोले, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती, डॉ.रिंकुजय केचे, वैद्यकीय अधिकारी, अंजनगाव बारी प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयातील अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील



अधिकारी व कर्मचारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.विटभट्टीवरील मजुरांच्या आरोग्य, शिक्षण व आहार बाबत समस्या एकूण घेतल्या.

शिक्षणापासून वंचित बालकाकरिता शाळा सुरू करण्याच्या सूचना शिक्षण विभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. यावेळी बालकल्याण उपकार्यकारी अधिकारी यांनाही टीएचआर देण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच अंजनगाव बारी प्राथमिक आरोग्य केंद्राकडून चांगली आरोग्य सेवा मिळत असल्या कारणाने सीईओंनी सर्व आरोग्य कर्मचारी व टिमचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना भद्रा मारोती मंदिर परिसरात विटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी शिक्षणाची व आहाराची सुविधा पुरविण्याच्या सुचना दिल्यात. याप्रसंगी पिंजरकर, अशोक पोकळे, पवन खेडेकर, प्रकाश राठोड, काटोले, ज्योती घुसे, कालिंदी झोडापे, नितीन राऊत, प्रवीण भिलकर, शाहरुख, पवार, रुपेश कावलकर यांच्यासह इतर आरोग्य कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# वीजबिल तपासा, नंतरच प्रॉपर्टी खरेदी करा!

## अन्यथा थकबाकी नव्या मालकाकडून होणार वसूली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )-** एखाद्या घराची, जागेची मालकी बदलली तरी पूर्वीच्या वीजबिलांच्या थकबाकीची वसुली करण्याचा अधिकार वीज वितरण कंपन्यांना असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळेच जुनी जागा, फ्लॅट, घर घेताना सावध रहा. त्याचे वीजबिल तपासा. कारण, पूर्वीच्या मालकाने थकविलेले वीजबिल नंतरच्या नवीन मालकाकडून वसूल होणार आहे.



दरम्यान, ज्या कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित (पी.डी.) ग्राहकांकडे वीजबिलाची थकबाकी आहे, त्यांना महावितरण अभय योजनेत व्याज व दंड माफ करून वीजबिल भरण्याची संधी देण्यात आली आहे. 31 मार्च 2025 पर्यंत सुरू असलेल्या या योजनेचा लाभ घेऊन संबंधितांनी बिले भरावी आणि पुढील कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

एखाद्या जागेचे वीजबिल थकित असेल आणि जागेचा विक्री व्यवहार झाला असेल, तर नवीन मालक वीज जोडणीसाठी नव्याने अर्ज करतात. त्यामुळे त्या जागेवरील पूर्वीच्या बिलाची थकबाकी प्रलंबित राहून वीज वितरण कंपन्यांचे नुकसान होते. त्यामुळे जागेच्या वीज बिलाची थकबाकी वसूल केल्याशिवाय नवीन वीजजोडणी देण्यास नकार देण्याचे अधिकार वीजवितरण कंपन्यांना आहेत. त्याविरोधात वीजबिलाची थकबाकी असलेली जागा खरेदी केलेल्या नव्या मालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. थकबाकी वसुलीसाठी या ग्राहकांची पडताळणी करण्याची मोहीम सुरू आहे. त्या अंतर्गत एखाद्या जागेच्या पूर्वीच्या मालकाने किंवा ताबेदाराने थकविलेल्या वीजबिलाची थकबाकी नंतरच्या नवीन मालक किंवा ताबेदाराकडून वसूल करण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना दिल्याचे महावितरणतर्फे सांगण्यात आले.

### 1.76 लाख ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत

महावितरणच्या अमरावती परिमंडलात 31 मार्च 2024 पर्यंत वीजबिलांच्या थकबाकीमुळे लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यक,औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील 1 लाख 76 हजार 798 ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला आहे. या ग्राहकांकडे 154 कोटी 17 लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील 71 हजार 145 ग्राहकांकडे 66 कोटी 92 लाख आणि व यवतमाळ जिल्ह्यातील 1 लाख 5 हजार 653 ग्राहकांकडे 87 कोटी 25 लाख रूपये थकीत आहे.

### सर्वोच्च न्यायालयात 19 प्रकरणे दाखल

महाराष्ट्रासह काही राज्यांतून अशा प्रकारची 19 प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना, जागेची मालकी बदलली तरी पूर्वीच्या वीजबिलांच्या थकबाकीची वसूली करण्याचा अधिकार वीज कंपन्यांना असल्याचे स्पष्ट केले आहे.

# चांदूर रेल्वेत रविवारी ‘एक पहाट निळ्या वादळाची’

## रमाबाई आंबेडकर व शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य

### भीमगर्जना मित्र मंडळ यांचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.13 ) -** भीम गर्जना मित्र मंडळ, चांदूर रेल्वे यांच्या वतीने माता रमाबाई आंबेडकर तथा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून एक पहाट निळ्या वादळाची या कार्यक्रमाचे आयोजन रविवार, 16 फेब्रुवारीला स्थानिक पंचायत समितीसमोर सकाळी 6 वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात नागपूर येथील सुप्रसिद्ध गायक फैजान ताज, शिव - फुले - शाहू - आंबेडकरी अभ्यासक सुबोध धुरंदर, वक्ते तथा सामाजिक कार्यकर्ते अथांग




करोडे, एमटीवी हसल 4 फेम रॅपर 99 साईड, मी रमाबाई बोलते एकपात्री नाट्यातील सुप्रिया वानखडे व चांदूर रेल्वे येथील भीमकन्या समाजभूषण अनिता गवई (राऊत) हे प्रामुख्याने उपस्थित राहुन आपले सादरीकरण करणार आहे. याशिवाय द ड्रीम डान्स ग्रुप अ‍ॅक्ट नागपूर, ए.के. क्र्यु अमरावतीचे पोट्टे, नाट्य ग्रुप अ‍ॅक्ट नागपूर, राज साऊंड डीजे हे या कार्यक्रमाचे आकर्षक राहणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन पंकज मेश्राम, सक्षम वानखडे, समीर मकेश्वर, रविकांत भोमकाळे, सौरभ गवई, देवा आठवले यांच्यासह भीमगर्जना मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मानवंदना समता सैनिक दलाच्या वतीने देण्यात येणार आहे.

# कृषी प्रदर्शनी नेमकी कुणासाठी?

## शासनाकडून 25 लाखांचा निधी तरी बचत गटांकडून पाच हजार रुपयांची वसूली





**मनिष जगताप**

**अमरावती,( दि.13 )** - शहरात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेमार्फत दि. 14 ते 18 फेब्रुवारी दरम्यान सायन्सस्कोर मैदानावर कृषी विकास परिषद व प्रदर्शनी आयोजित करण्यात आले आहे. 'आत्मा' च्या वतीने आयोजित हे पाच दिवसीय कृषी प्रदर्शन शेतकऱ्याना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी व बचत गटांकडून निर्मीत वस्तुंच्या विक्रीकरिता एक दालन मिळावे असा दूहेरी उद्देश या प्रदर्शनी मागिल आहे. असे असताना मात्र



कृषी प्रदर्शनीचे नियोजन भरकटल्याचे दिसत आहे. जिल्हा नियोजन समितीकडून 25 लाखांचा निधी या आयोजनाला मिळाल्यावरही बचत गटांना स्टॉल लावण्याकरिता त्यांच्याकडून प्रत्येकी पाच हजार रुपयांची वसूली केली जात आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेकडून गेल्यावर्षी राज्य स्तरीय कृषी प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी बचत गटांना मात्र 500 रुपयांमध्ये स्टॉल उपलब्ध करवून देण्यात आले होते. त्या तुलनेत या प्रदर्शनीमध्ये दहा पट वसूली करण्यात येत असल्याने नेमके हे कृषी प्रदर्शन कुणासाठी? असा प्रश्न निर्माण होत आहे.

सकाळी दहा ते रात्री दहा वाजेपर्यंत कृषीविषयक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन या कृषी प्रदर्शनादरम्यान करण्यात आले आहे. मिर्झा एक्सप्रेस, सुर नवा ध्यास नवा, हास्याचे तिखे बोल या कार्यक्रमांचे विशेष आकर्षण आहे. या प्रदर्शनीत धान्य, खाद्य, सेंद्रिय शेतमाल, शासकीय योजनांच्या माहितीसाठी स्टॉल्स राहणार आहेत. तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानासाठी कृषीला लागणाऱ्या मशिनरी आणि अवजारांचे प्रदर्शन राहणार आहे. सेंद्रीय शेतमालाची विक्रीशिवाय निविष्ठा कंपन्यांचा सहभागही राहणार आहे. या खासगी कंपन्यांना प्रत्येकी 10 हजार रुपये असे स्टॉलसाठी मोजावे लागणार आहे. तर महिला विकास महामंडळाच्या माध्यमातून बचत गटांचे स्टॉल लागणार आहेत.

> ही कृषी प्रदर्शनी नाविन्यपूर्ण योजनेतून घेण्यात येत आहे. त्यासाठी 25 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. एकुण खर्च 40 लाख येतो म्हणूनच कंपनीकडून दहा हजार, खाद्यपदार्थ बचत गटाकडून पाच हजार रुपये, इतर खाद्यपदार्थ स्टॉल कडून पाच हजार घेण्यात येते आहे. वीज बिल, पाण्याची व्यवस्था करावी लागते.
>
> **राहुल सातपुते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी.**

### कलाकारांवर होणार लयलुट

प्रदर्शनीलाच एवढा मोठा खर्च असताना यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये मोठमोठ्या कलाकारांना आमंत्रित करुन त्यांच्यावर पैशांची लयलुट होणार आहे. मोजका निधी असताना महागड्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन तरी कश्याकरिता असाही प्रश्न बचत गट चालकांकडून करण्यात येत आहे.

### फक्त 26 स्टॉल्सची माहिती

या ठिकाणी अनेक शासकीय स्टॉल त्याचबरोबर शेतकऱ्यांचे स्टॉल कंपन्यांचे स्टॉल बचत गटांचे स्टॉल लागणार आहे. मात्र कृषी विभागाकडून फक्त 26 स्टॉलची माहिती देण्यात आली आहे. इतर स्टॉल्सची माहिती जाणीवपुर्वक लपविली असल्याचे दिसत आहे. त्या सायन्स्कोर मैदानात पाच डोम उभे करण्यात आले आहे. त्यापैकी काही डोम मध्ये स्टॉल राहणार आहे. तसेच अनेक स्टॉलसाठी त्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आलेली आहे. एकीकडे कमी स्टॉल सांगायचे आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणात स्टॉलची उभारणी करायची, असा मानस कृषी विभागाचा दिसत आहे.

### मविम भरणार साडेतीन लाख

बचत गटांच्या स्टॉल्स करिता महिला आर्थिक विकास महामंडळ स्वत: साडेतीन लाख रुपये कृषी विभागाला देणार आहे. त्याचबरोबर अनेक कार्यक्रमात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या(डीआरडी) माध्यमातून बचत गटाचे स्टॉल लावण्यात येतात. मात्र कृषी विभागाकडून या कार्यालयाला स्टॉल लावण्यासंबधात अजूनपर्यंत कुठलेच लेखी पत्र देण्यात आलेले नसल्याचे संबंधित डीआरडी चे अधिकारी नितीन मेश्राम यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

### साफसफाईकरिता दामदुप्पट दर

उर्वरित जे बचत गट आहे खाद्यपदार्थाचे त्यांच्याकडून प्रति स्टॉल पाच हजार रुपये घेण्यात येणार आहे. त्यासंदर्भात आत्मा च्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांना विचारणा केली असता त्यांनी स्पष्टीकरण दिले की, वास्तवात या कार्यक्रमाला 40 लाख रुपये खर्च येत आहे. आम्ही साफसफाईचे पैसे म्हणून प्रती स्टॉल 5 हजार रुपये बचत गटांकडून घेत आहोत. शासकीय स्टॉल मात्र येथे विनामूल्य लागणार आहे, हे विशेष.

---

# हिवरखेडच्या दोन सख्ख्या बहिणींची पोलिस खात्यात निवड

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.13 )** - कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथील दोन सख्या बहिणींनी पोलीस दलात स्थान मिळवत गावाचे नाव उज्वल केले आहे. कु. आरती रामकृष्ण बंदे यांनी 2023 मध्ये तर त्यांची बहिण कु. पूजा रामकृष्ण बंदे यांनी 2025 मध्ये पोलीस भरती परीक्षा उत्तीर्ण करत हे यश प्राप्त केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी मिळवलेले हे यश गावासाठी अभिमानास्पद आहे.

आरती व पूजा या भगिनींचे वडील लोहारकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. तर आई गृहिणी आहे. त्यांचा एकुलता एक भाऊ सध्या शिक्षण घेत आहे. घरची आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच असली तरी या दोघींनी



जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर आपले स्वप्न साकार केले. कोणतीही विशेष सुविधा नसतानाही त्यांनी पोलीस भरती परीक्षेसाठी अपार मेहनत घेतली. पोलीस भरती परीक्षेत यश मिळवण्यासाठी शारीरिक आणि लेखी चाचण्या पार कराव्या लागतात. त्यामुळे या दोन्ही बहिणींनी कठोर मेहनत घेतली. पहाटे लवकर उठून व्यायाम, धावणे आणि शारीरिक तंदुरुस्तीवर भर दिला. त्याचबरोबर दिवसभर अभ्यास करून लेखी परीक्षेचीही तयारी केली. सातत्यपूर्ण प्रयत्न, आत्मविश्वास आणि चिकाटी यांच्या जोरावर त्यांनी हा टप्पा पार केला.दोन्ही बहिणींच्या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामस्थ, शिक्षक आणि नातेवाईक त्यांचे भरभरून कौतुक करत आहेत. आमच्या मुलींनी कठीण परिस्थितीतही हार न मानता पोलीस दलात स्थान मिळवले, याचा आम्हाला खूप अभिमान आहे, असे त्यांच्या आई-वडिलांचे म्हणणे आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी मेहनतीला पर्याय नाही. सातत्याने प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असा संदेश या यशस्वी बहिणींनी दिला आहे. त्यांच्या यशाने गावातील तरुणांना आणि विशेषत: मुलींना नवी प्रेरणा दिली आहे. हिवरखेडसारख्या ग्रामीण भागातून दोन सख्या बहिणींनी पोलीस दलात भरती होणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे.

# बियाणी महाविद्यालयात चार दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )**- येथील ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळाच्या सहकार्याने सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंटवर 20 ते 23 जानेवारी 2025 या कालावधीत अमरावती चार दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



कार्यशाळेचे उद्धाटन डॉ. राजीव बोरकर, (संचालक, विद्यार्थी विकास, एसजीबीएयू,अमरावती) यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एस.धोटे व कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे म्हणून प्रो.ए.के.गिरी यांची उपस्थिती लाभली होती. चार दिवसांच्या कार्यशाळेचे प्रास्ताविक सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंट कार्यशाळेचे संयोजक डॉ. एम.एम. महाजन यांनी केले. या प्रसंगी डॉ. पी. बी. रघुवंशी, अध्यक्ष, विद्यार्थी विकास कक्षाचे महाविद्यालयीन अध्यक्ष, अशोकजी महाले, सदस्य, एसडीसी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रा.अंकुश गिरी यांनी मार्गदर्शन केले. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना ध्येय निश्चिती, सादरीकरण कौशल्ये या विषयांमध्ये व्यक्तीचे ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेले लक्ष केंद्रित करणे, एकाग्रता आणि समर्पणाचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रा.जितेंद्र सिंह बारुळकर,(आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे) यांनी रिझ्युम लेखन, मुलाखत कौशल्ये, गट चर्चा याची माहिती देत कसे कपडे घालावे, कसे बसावे, कसे चालावे, संवाद साधावा आणि स्वत:ला कसे व्यक्त करावे हे शिकवण्यात आले. वारंवार विचारले जाणारे अनेक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली आणि विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांसाठी प्रात्याक्षिक मुलाखत घेण्यात आली. तिसऱ्या दिवशीच्या सत्रात प्रा.पल्लवी मांडोगडे, (संचालिका,एसएसएमटीटीए, अमरावती) यांनी वेळेचे व्यवस्थापन, मौखिक संवाद याबाबत माहिती दिली. तर डॉ.निखिलेश नालोडे, (श्रीमती जानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळ) यांनी एखाद्याच्या जीवनात प्रेरणेचे महत्व आणि चारित्र्य, नीतिमत्ता आणि नैतिकता याबाबत माहिती दिली. स्वत:चे चारित्र्य कसे घडवायचे आणि संस्थेत काम करताना विश्वासार्हता, जबाबदारी, काळजी, प्रामाणिकता याचे किती महत्व आहे, यावर मार्गदर्शन केले. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्याप्रमाणात आपली उपस्थिती राखली होती.

---

# एटीएम बदलून काढले 30 हजाराची रोख

## राजकमल चौक एटीएम घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 )** - एटीएम बदलून एका इसमाच्या बॅक खात्यातून 30 हजाराची रोख काढून घेतली. ही घटना 8 फेब्रुवारी रोजी सायंकाळी सिटी कोतवाली हद्दीतील राजकमल चौक स्थित एका एटीएममध्ये घडली. या घटनेची तक्रार दत्ता दिगंबर मोहोड (44, रा. गजानन टाउनशिप, कठोरा बु.) यांनी 10 फेब्रुवारी रोजी सिटी कोतवाली पोलिसात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शेतकरी दत्ता मोहोड यांना घर खरेदी करण्यासाठी प्रशांत नगरमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीला टोकनचे पैसे द्यायचे होते. त्यामुळे 8 फेब्रुवारी रोजी ते राजकमल चौकातील स्टेट बँकेच्या एटीएममध्ये पोहोचले. दत्ता मोहोड यांनी एटीएममध्ये कार्ड मशिनमध्ये टाकले असता, पैसे बाहेर आले नाही. त्यावेळी त्यांच्या मागे उभ्या असलेल्या आरोपीने सांगितले की, आम्हालाही पैसे काढायचे आहेत, लवकर करा, नाहीतर आम्हाला पैसे काढू द्या. त्यानंतर दत्ता यांनी त्यांना एटीएम दिले. दरम्यानच आरोपींनी एटीएम बदलले. त्यानंतर दत्ता मोहोड एटीएममधून बाहेर निघाले. त्यानंतर अज्ञात आरोपीने त्यांच्या इंडसइंड बँकेच्या एटीएममधून 30 हजार रुपये काढले. ही बाब लक्षात येताच, दत्ता यांनी बँकेत फोन केला, तेव्हा त्याला कळले की पाच वेळा पैसे काढले गेले आहेत.

# जागृत विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन मेळावा

## 1991 च्या बॅचचे विद्यार्थी आले एकत्र

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.13 )**- तेव्हाचे जागृत विद्यालय व आताच्या स्व. माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा शाळेच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याच्या निमित्ताने 1991 मध्ये शाळेत दहावीत शिक्षण घेतलेले विद्यार्थी पुन्हा एकदा एकत्र आले होते. यावेळी माजी मुख्याध्यापक शशिकांत बेलसरे, माजी वर्गशिक्षक रा. ल. केवटे आणि विद्यमान मुख्याध्यापक विजय आडे प्रामुख्याने उपस्थित होते. जागृत गोल्डन बॅचच्यावतीने तीनही



गुरुजनांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन माजी विद्यार्थी डॉ. सिद्धार्थ देवळे, वैशाली खेरडे व जुनेद पठाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी विद्यार्थी व गुरुजनांनी आपल्या मनोगतातून त्यावेळच्या आठवणींना उजाळा दिला.

मुख्याध्यापक विजय आडे यांनी आजही शाळा आपलीच आहे या भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी शाळेला सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वैशाली चिमोटे तर संचालन आनंद खेरडे व चंद्रकांत भड यांनी केले. नम्रता बोबडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला संदीप केंडे, स्नेहा जयस्वाल, लक्ष्मीकांत दळवी, दिपाली फरसूले, सुरेंद्र इंगळे, अर्चना दहुकर, वैशाली पोरकर, रूपाली काळे, डॉ मनीषा पोहरे, रिमोचंद, मनीष चौधरी, वैशाली भावे, दीपक अतकरे, नम्रता बोबडे, सुधीर टेकाळे, वैशाली चिमोटे, अभिलाषा कानगो, मीरा फरकाडे, प्रेमा वानखेडे, नंदा मडघे, चंद्रकांत भड, सतीश नेरकर, मनोज भोपळे, सुरेश खंडारे, डॉ. सिद्धार्थ देवळे, अंशुमन मानकर, आनंद खेरडे, नरेंद्र खेरडे, विजय सुरदुसे, वैभव विरखडे, प्रदीप गणोरकर, जुनेद पठाण, भूषण महात्मे, दामोदर वडस्कर, सुधीर श्रीराव आदी उपस्थित होते.

# अमरावतीच्या सोनारखेडा येथील महिला सरपंच एसीबीच्या जाळ्यात

## 36 हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 )** - भातकुली तालुका स्थित सोनारखेडा येथील महिला सरपंच या 36 हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्या आहेत. सोनु मुरलीधर सोळंके (30, रा. सोनारखेडा, मार्कंडा, ता. भातकुली, जि. अमरावती) असे लाचखोर महिला सरपंच लोकसेवकाचे नाव आहे.

तक्रारदार यांनी 10 फेब्रुवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तक्रारीच्या अनुषंगाने एसीबी पथकाने 11 फेब्रुवारी रोजी पडताळणी कारवाई केली असता, सरपंच सोनु मुरलीधर सोळंके यांनी लाचेची मागणी केल्याचे निदर्शनास आले होते. सरपंच सोळंके यांनी तक्रारदार यांनी केलेल्या वेगवेगळ्या बांधकामाची बिले काढली असुन सदर बिलाची रक्कम तक्रारदार यांना प्राप्त झाली आहे. सदरची कामे कामे मिळून देण्याकरिता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदाराला मदत केली आहे. त्यामुळे मिळालेल्या रक्कमेपैकी बक्षिस म्हणुन तक्रारदाराला 41 हजार रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर तडजोडी अंती 36 हजाराची लाच स्विकारण्याचे आरोपी लोकसेवकाने मान्य केले. दरम्यान 11 फेब्रुवारी रोजी एसीबी पथकाने सोनारखेडा येथे सापळा रचून सरपंच सोनु सोळंकेंना 36 हजाराची लाच स्विकारताना रंगेहात ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरुध्द खोलापुर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधिक्षक मंगेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संतोष तागड, योगेशकुमार दंदे, पोलिस हवालदार विनोद धुळे, राजेश मेटकर, पोलीस अंमलदार आशिष जांभोळे, महिला अंमलदार चित्रलेखा वानखडे, विद्या पाटील, पोलिस हवालदार गोवर्धन नाईक व बहिरट यांनी पार पाडली.

---

# अंजनगाव सुर्जी परिसरात पानपिंपरीचे उत्पादन घटले

## शेतकरी पिकविमा व अनुदानापासून वंचित | औषधी पिकांना राजाश्रय मिळण्याची गरज

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.13 )**- अंजनगाव सुर्जी तालुका व परिसरातील बागायतदार शेतकरी आजही मोठ्या प्रमाणात पानपिंपळी या औषधी वनस्पती पिकावर अवलंबून असला तरी गेल्या काही वर्षात या पिकाचे उत्पादन घटल्याने संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. विड्याच्या पानाचे मळे नष्ट झाल्यानंतर आता पानपिंपळीचे पीकही संपुष्टात येण्याच्या मार्गावर असताना संबंधित उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासन - प्रशासन मात्र पूर्णत: उदासीन दिसून येत आहे. पीक हातून गेल्यानंतरही या शेतकऱ्यांना अद्यापही विम्याची किंवा अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. परिणामी संबंधित शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती रोष निर्माण झाला आहे.

अमरावती जिल्ह्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असणाऱ्या अंजनगाव सुर्जी, चांदूरबाजार, अचलपूर तालुक्यात ओलिताची सोय उपलब्ध असणारे प्रामुख्याने बारी समाजातील शेतकरी पानपिंपळी या औषधी पिकाचे उत्पादन घेतात. आजही मोठ्या प्रमाणात या भागात पानपिंपरीची लागवड केली जाते. मात्र गेल्या काही वर्षात



वातावरणातील बदल आणि विविध रोगांच्या प्रादुर्भावामुळे पानपिंपरीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. अतिवृष्टी आणि मर रोगाचा सर्वाधिक फटका पानपिंपळी पिकाला बसला आहे. अपेक्षित उत्पादन होत नसल्याने पानपिंपळी उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून पूर्णत: हवालदिल झाला आहे. औषधी वनस्पतीचे उत्पादन घेणार्या शेतकऱ्यांना पूर्वी शासनाकडून सानुग्रह अनुदान दिले जायचे. त्यातून थोडाफार का होईना शेतकऱ्यांना दिलासा मिळायचा. हेक्टरी 25 हजार रुपयांपर्यंत अनुदान शासनातर्फे शेतकऱ्यांना दिले जात होते. पण आता उत्पादन घटल्याने हा शेतकरी अडचणीत आलेला असतानाच 2017 सालापासून शासनाने अनुदानही बंद केले आहे. त्यामुळे पानपिंपळी उत्पादकांसमोर चरितार्थ कसा चालवावा असा प्रश्न निर्माण झाला आहे. आर्थिक अडचणीमुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडल्यात, पण त्यानंतरही सरकारचे उदासीन धोरण कायम आहे. अनुदानासाठी 2024 मध्ये तत्कालीन राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या बैठकीत पानपिंपळीसाठी पिक विम्याची तरतूद, लागवडीसाठी पीक कर्ज उपलब्ध करून देणे, नवीन वाणाचे संशोधन करणे, पिकाशी निगडित प्रक्षेत्राला भेटी व प्रशिक्षण आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. विभागीय कृषी सहसंचालकांचीही यावेळी उपस्थिती होती. पानपिंपळी पिकाला हेक्टरी एक लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून देणे व पिक विम्यात या पिकाचा समावेश करून एक लाख रुपयांची मदत नुकसानी पोटी मिळवून देण्यावर बैठकीत भर देण्यात आला होता. याबाबतचा प्रकल्प अहवाल शासनाला पाठविण्यात आला. परंतु प्रदीर्घ कालावधी उलटून गेला असतानाही त्याला मंजुरी मिळालेली नाही. परिणामी पानपिंपळी उत्पादकांमध्ये शासनाप्रती नाराजी उमटली आहे.

### अनुदान मिळणे गरजेचे

पान पिंपरी पिकाची लागवड खर्चिक आहे. या पिकाच्या लागवडी व मशागतीसाठी एकरी अडीच ते तीन लाख रुपये एवढा खर्च येतो. गेल्या काही वर्षापासून या पिकावर सतत मर रोग व इतर रोगांचा प्रादुर्भाव पाहायला मिळत आहे. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झाली असून पान पिंपरीची लागवड शेतकऱ्यांसाठी न परवडणारी ठरत आहे. पिक विमा व अनुदानातून पानपिंपरी उत्पादकांना सहानुभूती द्यावी अशी मागणी शेतकरी मनोहर मुरकुटे, विजय लाडोळे, सुभाष थोरात यांनी केली आहे.


## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांक AMR/1946/18/24

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक . ११५/१९/२०२४

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री संत गजानन महाराज मंदिर शिक्षक कॉलनी अमला विश्वेश्वर तालुका चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती बाबत.

न्यासाचा पत्ता :- श्री रामेश्वर महादेवराव वासनकर, आमला विश्वेश्वर तालुका चांदूर रेल्वे, अमरावती, अमरावती चांदूर रेल्वे, अमला विश्वेश्वर

अर्जदार :- श्री रामेश्वर महादेवराव वासनकर,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अमरावती हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

(अ) जंगम मिळकत :- रोख रू. /- मात्र

| अ.क्र. | तपशिल | अंदाजे मूल्य |
|---|---|---|

(अक्षरी रूपये मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन)

(ब) स्थावर मिळकत :- रोख रू. २०००००/- मात्र

(अक्षरी रूपये दोन लाख मात्र फक्त)

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AMALA VISHWESHWAR TALUKA CHANDUR RAILWAY DIST AMRAVATI | GAVNAMUNA 8A | TO AREA 5300 CHO FIT. CON. 390 CHO. FIT | MANDIR | 200000.00 |

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २१-०८-२०२४ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**